संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# भारताकडून पाकिस्तानची आणखी नाकेबंदी

**पाकिस्तानबरोबरचा** रस्ते मार्गाने होणारा व्यापार भारताने थांबवण्याचा निर्णय घेऊन पाकिस्तानला दुसरा तडाखा दिला आहे. सीमावर्ती भागातून पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ या देशांमध्ये रस्ते मार्गानेही काही प्रमाणात दळणवळण सुरु असते. लोकांची गैरसोय होऊ नये आणि दोन देशातील निदान व्यावसायिकसंबंध काही प्रमाणात सुरु ठेवले जावेत हा त्यामागचा हेतू असतो. पुलवामा प्रकरण घडल्यानंतर भारताने पाकिस्तानबरोबरच्या सर्वच संबंधांबाबत अधिक कडक धोरण स्वीकारले आहे. काही व्यापारी निर्बंध लादल्यानंतर पाण्याबाबतही भारताने अशीच कडक भूमिका घेतली आणि पाकिस्तानला होणारा पाणीपुरवठा वळवण्याचा निर्णय घेतला. हे करण्यामागचा उद्देश अतिशय स्पष्ट आहे. भारताने अनेकवेळेला पाकिस्तानबरोबर संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. शेजारचा देश म्हणून जेवढ्या काही चांगल्या गोष्टी करता येतील त्याला भारताने नेहमीच प्राधान्य दिले. परंतु काश्मिर प्रश्नाचे निमित्त करून भारतात घुसखोरी करणे दहशतवाद माजवणे अशा गोष्टी इतक्या सर्रासपणे होऊ लागल्या की त्याकडे कितीकाळ दुर्लक्ष करायचे असा प्रश्न उपस्थित झाला. गेल्या चार वर्षात तर भारतीय लष्करांच्या तीन तळांवर दहशतवादी हल्ले करून भारताबरोबर अघोषितयुद्ध करण्याचाच कट केला. उरी, पठाणकोट, या दोन लष्करी तळांवर दहशतवाद्यांच्या माध्यमातून थेट हल्ले केले गेले. तर पुलवामा येथे केंद्रीय राखीव दलाचा ताफा बसमधून जात असताना आत्मघातकी हल्ला करून चाळीस जवानांचे बळी घेतले. तो प्रकार भारताच्यादृष्टीने एक शेवटची घटना ठरली. आणि आता यापुढे पाकिस्तानचे लाड नाहीत. असा निर्धारही देशभरातून व्यक्त झाला. पुलवामा हल्ल्याचा तितक्याच ताकदीने बदला घेतला पाहिजे. अशी संतप्त प्रतिक्रिया देशातून व्यक्त झाली. त्याला प्रतिसाद देण्याशिवाय सरकार आणि लष्करापुढे पर्यायच शिल्लक नव्हता. स्वाभाविकपणे पाकिस्तानमध्ये असलेल्या बालाकोट इथला दहशतवाद्यांचा अड्डा भारतीय हवाई दलाने तिथे जाऊन उद्ध्वस्त केला. त्यानंतरही पाकिस्तानच्या कुरापती फारशा थांबलेल्या दिसत नाहीत. कारण गेल्या दोन महिन्याच्या काळात जवळपास चाळीसवेळा पाकिस्तानने सीमेपलिकडून गोळीबार चालू ठेवला. तर जम्मू काश्मिरमध्ये दहशतवादी घुसवणे किंवा हल्ले करणे हे प्रकार सुरु राहिले. त्याचाही शोध जेव्हा भारताकडून घेतला गेला तेव्हा या रस्ते मार्गाने चालणारा व्यापाराचाही पाकिस्तानकडून गैरवापर होत असल्याचे लक्षात आले.

## घुसखोरी आणि तस्करी

या मार्गाने शस्त्रे पाठवणे , बनावट चलनाची तस्करी करणे, मादक पदार्थांचे साठे रवाना करणे असे प्रकार आढळून आल्याने या मार्गावरचा पाकिस्तानबरोबरचा व्यापार बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला. खरे तर ही गोष्टदेखील खूप उशिरा घडली आहे. ज्याप्रमाणे काश्मिरमधल्या फुटीरतावाद्यांची नाकेबंदी केली गेली त्यांना पाकिस्तानकडून मिळणारी रसद थांबवली गेली. काश्मिरमध्ये राहून तिथल्या सर्व सेवा सुविधांचा उपभोग घेऊन पाकिस्तान झिंदाबादचे नारे देणारे हे फुटीरतावादी पाकिस्तानचेच एजंट असल्याचे सिध्द झाले. त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा झालेली कोट्यवधीची रक्कम ही पाकिस्तानची कृपा असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. त्यांच्या या मौजमस्तीला आवळले गेले. ज्या पैशावर काश्मिरमधल्या तरूणांना दगडफेक करण्यासाठी प्रवृत्त केले जात होते. त्याचा बंदोबस्त झाला. तरीदेखील काही प्रमाणात दहशतवाद्यांच्या हालचाली लष्कराच्या लक्षात आल्या त्यावेळी या जम्मू काश्मिर ते पाकिस्तानात जाणाऱ्या महामार्गाचा मोठ्या प्रमाणावर गैरफायदा घेतला जात असल्याचे समोर आले. हा महामार्ग बंद करण्याचा निर्णय झाल्याबरोबर स्थानिक राजकारण्याचाही तिळपापड होणे स्वाभाविक होते. त्यांनी सरकारच्या या निर्णयाला विरोध करण्याचा प्रयत्न करून आपली पाकधार्जिणी वृत्तीच दाखवून दिली. लष्कर सर्व प्रकारची दक्षता घेत असूनही जर ते शस्त्र येत असतील. किंवा चलनी नोटांची तस्करी होत असेल तर त्याचे मार्ग बंद करण्याशिवाय पर्याय नव्हता. आता या निर्णयाची अंमलबजावणी सुरु केल्यानंतर दहशतवादी आणि त्यांच्या पोषिंद्यांना नवा तडाखा बसणार आहे. गेल्या दोन महिन्यात भारताकडून एकापाठोपाठ केलेली ही उपाययोजना काश्मिरमधल्या तथाकथित समस्येची पाळेमुळे शोधणारी ठरतात. ज्याच्याकडे आतापर्यंत अक्षम्य दुर्लक्ष झाले. केवळ राजकीय स्वार्थापोटी या सर्व देशविरोधी कृत्यांना प्रोत्साहनच दिले गेले. या उपाययोजनांची किंवा अशा प्रकारच्या नाकेबंदीची काटेकोर अंमलबजावणी जर केली आणि त्यात सातत्य राहिले तर काश्मिरमधल्या अस्थिरतेला मूठमाती मिळू शकेल.

## सर्वच सीमावर्ती भाग असुरक्षित

ही नाकेबंदी करण्याचा निर्णय तसे उशिरा सुचलेल्या शहाणपणातच मोडणारे आहे. पुलवामा प्रकरणानंतर तातडीने याबाबतची उपाययोजना अपेक्षित होती. खरे तर पाकिस्तानबरोबर कोणत्याच प्रकारचे आर्थिक व्यवहार भारताने करू नयेत. अगदी मानवतेच्या दृष्टीकोनातूनही दिल्या जाणाऱ्या सोयीसवलती ताबडतोब थांबवाव्यात. किंवा परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून जो काही औपचारिकपणा केला जातो त्यातले तथ्यही शोधून काढावे आणि भारताला ज्या गोष्टींचा तोटा होतो किंवा भारताने देऊ केलेल्या या सोयीसवलतींचा गैरफायदा घेतला जातो. तो थांबवला पाहिजे. खरे तर भारताच्या सर्व सीमावर्ती भागात अशाच कठोर नाकेबंदीची आवश्यकता आहे, अगदी आजही बांगलादेश, नेपाळ या भागातून उघडपणाने घुसखोरी होते. विविध पदार्थांची तस्करीही होते. सीमेवर असलेल्या पोलीस चौक्यांमध्ये चालणारा भ्रष्टाचार हे त्याचे कारण आहे. यासंदर्भातसुध्दा अतिशय कठोर निर्णयांची गरज आहे. श्रीलंका आणि तामिळनाडू यांच्यामधले तथाकथित व्यापारही असेच तपासले गेले पाहिजेत. तामिळनाडूच्या किनाऱ्यावर सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होते. आणि याच परिस्थितीचा गैरफायदा घेऊन तामिळी वाघ म्हणजेच लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम या संघटनेने आपला दहशतवाद निर्माण केला होता. तो इतका वाढला की श्रीलंकेतल्या अशांततेचा फटका भारताला बसला. आणि त्यातूनच राजीव गांधींची हत्या केली गेली. यासाठीच या सर्व सीमावर्ती भागांची तटबंदी भक्कम केली पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या बेकायदा गोष्टी तिथे घडणार नाहीत याची भरभक्कम हमी मिळायला हवी.